## नियमित दिवाणी दावा क्र. ५५/२०११ मधील
## निशाण क्र. १३५ खालील आदेश
## (**CNR No**.– **MHRT**050004592011)

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे दि.१६/०७/२०१७ रोजी निधन झाले आहेत. प्रतिवादी क्र.७ यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणे प्रतिवादी क्र.१ यांचेकडुन अनावधाने राहून गेले आहे. प्रतिवादी क्र.७ चे वारस अभिलेखावर आणण्याकरीता सुमारे २६७० दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब प्रतिवादी क्र.१ यांनी जाणूनबुजून केलेला नाही. प्रतिवादी क्र.७ ह्या मयत झालेचे प्रतिवादी क्र.१ यांच्या लक्षात आल्यानंतर प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींची नावे, पत्ते, वये यांची माहिती घेतली व ती वकीलांना दिली. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.७ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर विहीत मुदतीत अभिलेखावर घेता आले नाही. त्यामुळे विलंब झाला आहे. त्यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्याकरीता प्रतिवादी क्र.१ यांचा कोणताही निष्काळजीपणा नव्हता. प्रतिवादी क्र.७ चे कायदेशीर प्रतिनिधींना याप्रकरणी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ न झाल्यास प्रस्तुत प्रतिवादीचे पैशाच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होईल. तरी वर नमुद कारणास्तव प्रतिवादी क्र.७ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्याकरीता झालेला २६७० दिवसांचा विलंब माफ करून मिळण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी नि. १४४ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे दाव्यामध्ये ९० दिवसांचे आत रेकॉर्डवर घ्यायचे असतात तरी प्रतिवादी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घ्यायला इतका प्रदिर्घ उशीर का झाला याबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नसल्यामुळे प्रतिवादी क्र. ७ यांचेविरुध्द दावा अबेट झाला आहे. दोन्ही दाव्याचे कामी प्रतिवादी आवश्यक पक्षकार

नाहीत. प्रतिवादी क्र.१ यांनी या आधिच प्रतिवादी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते तरी कोणतेही संयुक्तीक कारण न दिल्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. सदरचा अर्ज मंजुर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास प्रतिवादी यांना जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा अशी विनंती त्यांचे म्हणण्याद्वारे केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला, त्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे सन्मानिय विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीत उभा केलेला वाडा पाडून त्याचा खुला व मोकळा कब्जा, वादी यांना देण्याकरीता आदेशात्मक ताकीदीचा व प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करु नये असा निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र.१ याने नि.२६ कडे प्रतिदावा मिळकतीतील वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी केलेल्या अतिक्रमीत भागातील बांधकाम तोडून त्याखालील जागा खुली करुन देण्याबाबत आदेश मिळण्यासाठी प्रतिदावा दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिदाव्यातील प्रकरणातील प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे दि.१६/०७/२०१७ रोजी मयत झालेची बाब यातील वादी यांनी नाकारलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे अर्जाचे पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच अर्जासोबत प्रतिवादी क्र. ७ पार्वती यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.७ ह्या दि. १६/०७/२०१७ रोजी मयत झाल्या असल्याने मुदतीच्या कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना ९० दिवसांचे आत प्रतिदाव्याच्या अभिलेखावर प्रतिवादी क्र.१ तर्फे घेणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनांचा विचार करता, प्रतिवादी यांनी सदर मयताच्या कायदेशीर प्रतिनिधींची नावे, पत्ते, वये यांची माहिती घेवुन वारसांना अभिलेखावर घेण्यास सदरचा विलंब झालेला दिसून येतो. परंतु प्रतिवादी क्र.१ यांच्या युक्तीवादाचा विचार करता त्यांना प्रतिवादी क्र.७ यांच्या मृत्युची माहीती कळताच त्यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. प्रस्तुत दावा व प्रतिदाव्याचे अवलोकन केले असता व प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ च्या प्रतिदाव्यातील मागणी पाहता प्रतिवादी क्र.७ चे कायदेशीर प्रतिनिधींना याकामी प्रतिदाव्याच्या अभिलेखावर घेणेची संधी प्रतिवादी क्र.१ यांना दिल्यास सदर

वादविषयाला घेवून भविष्यात दाखल होणा–या अनेक दाव्यांची पुर्नरावृत्ती थांबेल. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास आवश्यक ते पक्षकार प्रतिदाव्यात सामील होणार आहेत आणि प्रतिदावा कायदेशीरपणे गुणदोषांवर चालवून अंतिमरित्या निकाल होण्यासाठी ते आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.७ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्याकरीता २६७० दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येते. परंतु विलंब झाला यास्तव त्यांचा अर्ज फेटाळून लावल्यास प्रतिदावा गुणदोषावर निकाली होणार नाही व प्रतिवादी क्र.१ यांचेवर अन्याय होईल त्यामुळे सदरचा विलंबासाठी प्रतिवादी क्र.१ यांना योग्य कॉस्ट करणे न्यायोचित होईल. या सर्व कारणास्तव प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र.७ चे कायदेशीर प्रतिनीधीनां अभिलेखावर घेण्याकरीता परवानगी देणे उचित होईल असे मला वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अर्ज (नि. १३५) हा रक्कम रु. १०००/– इतकी रक्कम वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.७ श्रीमती पार्वती धोंडू पंडे यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणेस झालेला २६७० दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी सदरची रक्कम पुढील तारखेस न चुकता वादीस देण्याची आहे.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2025.03.04 17:44:08 +0530

**दिनांक– ०३/०३/२०२५**

**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt.S.K.Kharat |
| Court Name | : | 2nd Jt. Civil Judge, J.D., Khed. |
| Date of Decision | : | 03/03/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 03/03/2025 |
| Order uploaded on | : | 04/03/2025 |